प्रसारमाध्यमांशी संबंधित व्यक्तींना
अधिस्विकृती पत्र देण्यासंबंधीचे नियम

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन पूरकपत्र क्र.अधिस्वि-२००८/१००६/प्र.क्र.४९/०७/(भाग-२)/३४,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३१ जानेवारी, २००९

संदर्भ-शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग
१) क्र.अधिस्वी-२००७/३५३/प्र.क्र.४९/३४, दि. १९ सप्टेंबर, २००७
२) शासन शुध्दीपत्रक क्र.अधिस्वि-२००७/प्र.क्र.४९/३४, दि. ७ जानेवारी, २००८
३) शासन शुध्दीपत्रक क्र.अधिस्वि-२००७/प्र.क्र.४९/३४, दि. ७ फेब्रुवारी, २००८
४) शासन निर्णय क्र.अधिस्वि-२००८/२६९/प्र.क्र.४९/०७/३४, दि. ७ मार्च, २००८
५) शासन निर्णय क्र.अधिस्वि-२००८/२६९/प्र.क्र.४९/०७/३४, दि. २९ एप्रिल, २००८
६) संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
यांचे पत्र क्र.अधिस्वि-१०(२००८) वृत्त/का. २/४५२ दि. ३ नोव्हेंबर २००८

शासन पूरकपत्र:-

प्रसारमाध्यमांशी संबंधीत व्यक्तींना अधिस्विकृती पत्र देण्यासंबंधींची नियमावली दि. १९ सप्टेंबर, २००७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहे. या नियमावलीच्या विविध नियमांमध्ये संदर्भाधीन दि. ७ जानेवारी व दि. ७ फेब्रुवारी २००८ च्या शुध्दिपत्रकान्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत. संचालक (माहिती) यांच्या संदर्भाधिन पत्रान्वये प्रस्तावित केल्यानुसार खालिलप्रमाणे सुधारणा करण्यात येत असून **पूर्वीच्या नियमासह सुधारित नियम खालीलप्रमाणे वाचण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे**

**पूर्वीचा नियम क्र. ७ (१) ए-** पत्रकारितेमध्ये दीर्घकाळ म्हणजे किमान २० वर्षे सवेतन सेवा केलेले, वृत्तसंकलनाच्या कामाशी निगडीत असलेले व निवृत्तीनंतरही वृत्तपत्रात आणि नियतकालिकांमध्ये सातत्याने लेखन करीत असलेले ज्येष्ठ पत्रकार. मात्र ज्येष्ठ पत्रकारांनी अर्ज सादर करताना सोबत २० वर्षे सवेतन सेवा केल्याबद्दलचे आवश्यक ते अधिकृत पुरावे जोडावेत.

श्रमिक पत्रकारांना निवृत्ती नंतर ज्या प्रमाणे ज्येष्ठ पत्रकार म्हणून अधिस्वीकृती पत्रिका देण्यात येते त्याच प्रमाणे वृत्तपत्रांचे मालक-संपादक यांनाही वीस वर्षाच्या पत्रकारितेनंतर निवृत्ती घेतल्यास ज्येष्ठ पत्रकार म्हणून त्यांना अधिस्वीकृती पत्रिका देण्यात यावी.

ज्या स्वतंत्र व्यवसायी पत्रकारांची वीस वर्ष पत्रकारिता झाली आहे त्यांनाही ज्येष्ठ पत्रकार म्हणून अधिस्वीकृती पत्रिका देण्याबाबत विचार व्हावा. यासाठी त्यांनी २० वर्षे स्वतंत्र व्यवसायी पत्रकार असल्याबाबतचे पुरावे अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**नियम क्र. ७(१) ए पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा.** पत्रकारितेमध्ये दीर्घकाळ म्हणजे किमान २० वर्षे सवेतन सेवा केलेले, वृत्तसंकलनाच्या कामाशी निगडीत असलेले व निवृत्तीनंतरही वृत्तपत्रात आणि नियतकालिकांमध्ये सातत्याने लेखन करीत असलेले ज्येष्ठ पत्रकार. मात्र ज्येष्ठ पत्रकारांनी अर्ज सादर करताना सोबत २०वर्षे सवेतन सेवा केल्याबद्दलचे आवश्यक ते अधिकृत पुरावे जोडावेत.

ज्या पत्रकारांची ३० वर्षापेक्षा जास्त काळ सवेतन सेवा झालेली आहे अशा ज्येष्ठ पत्रकारांना अधिस्विकृती पत्रिका देताना त्यांनी विहित नमुन्यात साध्या कागदावर अर्ज करावेत. अन्य कागदपत्रे जोडणे त्यांच्यावर बंधनकारक असणार नाही. मात्र, त्या पत्रकाराचे वय किमान ६० वर्षे तर सवेतन सेवा ३० वर्षाची

असावी. परंतु त्यांचे पत्रकारितेखेरीज अन्य कोणतेही उपजिवीकेचे साधन नसावे. असे त्यांनी लेखी अर्जात स्पष्ट नमूद करावे,"

श्रमिक पत्रकारांना निवृत्ती नंतर ज्या प्रमाणे ज्येष्ठ पत्रकार म्हणून अधिस्वीकृती पत्रिका देण्यात येते त्याच प्रमाणे वृत्तपत्रांचे मालक-संपादक यांनाही वीस वर्षाच्या पत्रकारितेनंतर निवृत्ती घेतल्यास ज्येष्ठ पत्रकार म्हणून त्यांना अधिस्वीकृती पत्रिका देण्यात यावी.

ज्या स्वतंत्र व्यवसायी पत्रकारांची वीस वर्ष पत्रकारिता झाली आहे त्यांनीही ज्येष्ठ पत्रकार म्हणून अधिस्वीकृती पत्रिका देण्याबाबत विचार व्हावा. यासाठी त्यांनी २० वर्षे स्वतंत्र व्यवसायी पत्रकार असल्याबाबतचे पुरावे अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**पूर्वीचा नियम क्र. ७(१) ऐ: राज्य शासनाच्या प्रसार माध्यमातील प्रतिनिधींना अधिस्वीकृती देण्यासंबंधी:**

राज्य शासनाच्या प्रसारमाध्यमांतील वृत्तसंकलनविषयक काम करणारे अधिकारी व कर्मचारी तसेच निवृत्त झाल्यानंतर प्रसारमाध्यमांतून सातत्याने लेखन करणारे वृत्त संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी यांना अधिस्वीकृती पत्रिका देण्याचा अधिकार शासनास राहील. मात्र निवृत्त अधिकारी हा कोठेही नोकरी करणारा नसावा. अशा सेवानिवृत्त अधिकाऱ्यास अधिस्वीकृती पत्रिका दिल्यावर पुढील राज्य अधिस्वीकृती समितीच्या बैठकीत त्यांची यादी सादर करण्यात यावी.

राज्य शासनाच्या माहिती खात्याच्या अधिकार कक्षेतील अधिस्वीकृतीधारकांना प्रचलित अधिस्वीकृती कार्डासारख्याच परंतु वेगळया रंगाच्या अधिस्वीकृती पत्रिका देण्यात याव्यात. या कार्डातील मजकूरही त्या अनुषंगाने "शासकीय प्रसारमाध्यम" असा बदललेला असावा.

**नियम क्र. ७(१) ऐ पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा.** "माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील जे अधिकारी आणि कर्मचारी उदा: उपसंपादक, माहिती सहायक, छायाचित्रकार, टी.व्ही.कॅमेरामन, टी. व्ही.कॅमेरा सहायक हे कर्मचारी सेवेत असताना त्यांना शासकीय प्रसार माध्यमाची अधिस्विकृती पत्रिका मिळते, परंतु हे कर्मचारी सेवा निवृत्त झाल्यानंतर त्यांना अधिस्विकृती पत्रिका मिळत नाही. ती मिळावी, परंतु ते वृत्तपत्रात सतत लेखन करीत असले पाहिजेत किंवा वृत्तपत्रासाठी छायाचित्राचे काम किंवा कव्हरेज करीत असले पाहिजेत. परंतु हे कर्मचारी अन्यत्र कोठेही नोकरी करणारे नसावेत. अशा सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांना अधिस्विकृती पत्रिका देण्यात येईल."

राज्य शासनाच्या माहिती खात्याच्या अधिकार कक्षेतील अधिस्वीकृतीधारकांना प्रचलित अधिस्वीकृती कार्डासारख्याच परंतु वेगळया रंगाच्या अधिस्वीकृती पत्रिका देण्यात याव्यात. या कार्डातील मजकूरही त्या अनुषंगाने "शासकीय प्रसारमाध्यम" असा बदललेला असावा.

**पूर्वीचा नियम क्र. ८(३)** :अधिस्वीकृती मिळण्यासाठी अर्जदाराचे किमान वय २१ वर्षे असावे. पत्रकारितेचा किमान ३ वर्षाचा कृतीशील अनुभव असावा. किमान शैक्षणिक पात्रता बारावी उत्तीर्ण अशी असावी. शैक्षणिक पात्रतेचा पुरावा म्हणून मूळ प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

**नव्याने नियम क्र.८ (३) (अ) अंतर्भूत करण्यात येत आहे :** "किमान शैक्षणिक पात्रता १२ वी उत्तीर्ण याचा अर्थ १० वी उत्तीर्ण नंतर दोन वर्षे किंवा तीन वर्षाची मान्यता प्राप्त संस्थेची पदविका उत्तीर्ण असल्यास ती १२ वी उत्तीर्ण अशी समकक्ष मानली जावी. अथवा कोणत्याही विद्यापीठाच्या बी.ए., बी.कॉम., बी.एस.सी. भाग १ यासाठी प्रवेश घेतलेला असावा.

सन १९७५ पूर्वी जे पत्रकार जुनी ११ वी उत्तीर्ण झालेले असतील ते सुध्दा शैक्षणिक अर्हता पूर्ण करीत आहेत म्हणनेच १२ वी उत्तीर्ण आहेत असे समजण्यात येईल."

शैक्षणिक पात्रतेचा पुरावा म्हणून मूळ प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी

**नव्याने नियम क्र.८ (१३) अंतर्भूत करण्यात येत आहे :** "जे पत्रकार वृत्तपत्रात "अर्धवेळ" काम करतात अशा व्यक्ती अन्यत्रही पत्रकार म्हणूनच कार्यरत असणे अपेक्षित आहे, अशांनाच अधिस्विकृती पत्रिका देण्यात यावी. पत्रकारिते व्यतीरिक्त अन्य प्रकारचे काम अर्धवेळ करणा-यांना राज्य शासनाची अधिस्विकृती पत्रिका देता येणार नाही. तसेच अर्धवेळ काम करणारा पत्रकार याचा अर्थ विविध वृत्तपत्रात किंवा वृत्तसंस्थात अंशकालीन स्वरूपात काम करणारा पत्रकार असा होतो. पत्रकारिता हे त्याचे उपजिवीकेचे एकमेव साधन असावे. हे स्पष्ट करण्यात येत आहे."

हे शासन पूरकपत्र निर्गमित केलेल्या दिनांकापासून अंमलात येईल.

हे शासन पूरकपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा संगणक संकेतांक २००९०१३१११३११५८००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

(तु. वि. लव्हटे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (मा. व ज.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मुख्यसचिव यांचे उपसचिव, मुख्यसचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई
सचिव (मा. व ज.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
संचालक (माहिती)(प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
संचालक (माहिती), नागपूर, औरंगाबाद, अमरावती, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
उपसंचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,अमरावती,
सर्व विभागीय उपसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, कोकण, पुणे, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर
सर्व जिल्हा माहिती अधिकारी,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, ओ-८, स्टेट एम्पोरियम इमारत, बाबा खडकसिंग मार्ग, नवी दिल्ली-११० ००१
वरिष्ठ सहाय्यक संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, श्री.काकुले यांची इमारत, दादा वैद्य रोड, पणजी, गोवा,
सर्व संबंधित संघटना आणि व्यक्ती,
निवड नस्ती.